# असे करा वांगी पिक संरक्षण

प्रा. वैभव गिरी
सहाय्यक प्राध्यापक
कृषी किटकशास्त्र विभाग

प्रा. तुषार जगताप
सहाय्यक प्राध्यापक
कृषी किटकशास्त्र विभाग

दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव, औरंगाबाद



वांगी या भाजीपाला पिकाची लागवड वर्षभर सर्व हंगामात खरीप, रब्बी आणि उन्हाळ्यातही करता येते. कोरडवाहू शेतीत आणि मिश्रपीक म्हणूनही वांग्याची लागवड करतात. आहारात वांग्याचा भाजी, भरीत, वांग्याची भजी, इत्यादी अनेक प्रकारे उपयोग होतो. पांढरी वांगी मधुमेह असलेल्या रोग्यांना गुणकारी असतात. वांग्यामध्ये खनिजे अ, ब, क ही जीवनसत्वे तसेच लोह, प्रथिने यांचे प्रमाण पुरेसे असते. परंतु किड व रोगांमुळे पिकाच्या उत्पादनात घट येते त्यासाठी वेळीच किड व रोगांचे नियंत्रण करणे गरजेच आहे.

## रोग व्यवस्थापन:

- ### बोकड्या किंवा पर्णगुच्छ:

लक्षणे: या रोगामुळे पानांची वाढ खुंटते. ती लहान आणि बोकडल्यासारखी दिसतात. याचा प्रसार तुडतुडयांमुळे होतो.



उपाय:

- बी पेरताना दोन ओळीत फोरेट हेक्टरी दाणेदार औषध प्रती वाफयास २५ ग्रॅम या प्रमाणात द्यावे.
- रोपे लावण्यापूर्वी मोनोक्रोटोफॉस ३६ डब्ल्यु. एस. सी. १५ मिली व १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

- ### मर रोग:



लक्षणे: हा बुरशीजन्य रोग असून जमिनीत असणाऱ्या फ्युज्यारियम नावाच्या बुरशीमुळे होतो. या रोगामुळे झाडांची पाने प्रथमतः पिवळी पडतात. शिरेमधील पानांवर खाकी रंगाचे डाग दिसतात. झाडाचे खोड मधून कापल्यास आतील पेशी काळपट दिसतात. झाडांची वाढ खुंटते व शेवटी झाड मरते.

उपाय:

- रोगास बळी न पडणाऱ्या जातींची लागवड करावी.
- पिकांची फेरपालट करावी.
- नियमितपणे झाडावर बुरशीनाशकाचा फवारा करावा.
- पेरणीपूर्वी बियाण्यास ३ ग्रॅम प्रति किलो थायरम बियाण्यास चोळावे.

## वांगी पिकातील बुरशीजन्य रोगाचे एकात्मिक रोग व्यवस्थापन:

- पानांवरील करपा, फळकूज, पानांवरील ठिपके आणि भुरी या रोगांच्या नियंत्रणासाठी बाविस्टीन १० ग्रॅम अथवा डायथेन एम-४५, २५ ग्रॅम यांपैकी एक औषध, परंतु आलटून पालटून १० लिटर पाण्यात मिसळून तीन फवारण्या १५ दिवसांच्या अंतराने द्याव्यात.
- भुरीसाठी पाण्यात विरघळणारे गंधक २५ ग्रॅम वरील औषधात मिसळून फवारणी करावी.
- जमिनीतील बुरशीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्माचा वापर केला नसल्यास लागवडीनंतर किंवा रोगाची लक्षणे दिसताच बाविस्टीन १० ग्रॅम बुरशीनाशक १० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेले द्रावण साधारणतः ७० ते १०० मि.लि. झाडाच्या बुंध्याभोवती रिंग करून १५ दिवसांच्या अंतराने दोनदा ओतावे.
- रोगाचा प्रादुर्भाव झालेले रोगग्रस्त पाने, सडलेले, किडके फळे गोळा करून बांधावर किंवा प्लॉट शेजारी उघड्यावर न टाकता जाळून नष्ट करावे.
- रोग प्रतिकारक वाणांची लागवड करावी.
- लागवडीनंतर रोपावर पाने लहान होणे किंवा बोकड्या (लिटल लिफ) या रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून रोपवाटिकेमध्ये वाफ्यावर बी पेरताना फोरेट १० टक्के दाणेदार औषध ३ बाय १ मिटर आकाराच्या वाफ्यासाठी २० ग्रॅम या प्रमाणात बियाण्याच्या दोन ओळींमध्ये टाकावे.

## किड व्यवस्थापन:

- ### शेंडा आणि फळे पोखरणारी अळी:

लक्षणे: या किडीमुळे वांगी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. चिकट पांढऱ्या रंगाच्या या अळ्या शेंड्यातून खोडात शिरून आतील भाग पोखरून खातात आणि त्यामुळे झाडाची वाढ खुंटते. फळे लहान असताना अळी देठाजवळून फळात शिरून फळाचे नुकसान करते.



उपाय:

- किड लागलेले शेंडे अळी सकट नष्ट करावेत. त्यानंतर निंबोळी अर्क ५ टक्के ची (निंबोळी पावडर ५ किलो प्रती १०० लिटर पाणी याप्रमाणे भिजवून आर्क काढून घ्यावा) फवारणी घ्यावी.
- लैंगिक गंध सापळे ५ प्रती अर्धा एकर प्रमाणे लावावीत त्यातील गोळी दर १५ दिवसांनी बदलावी.
- प्रकाश सापळे १ प्रती अर्धा एकर क्षेत्रात लावावा.
- फवारणीसाठी क्लोरोपायरीफॉस १७ मि.ली. प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. त्यानंतर डायमिथोएट १५ मिली + नुवान ८ मि.ली. प्रती १० लिटर पाणी मिसळून फवारणी करावी. ४० ग्रॅम कार्बारिल किंवा १४ मिली मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के किंवा २.४ मिली सायपरमेथिन, २५ टक्के १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा १० टक्के कार्बारिल भूकटी दर हेक्टरी २० किलो या प्रमाणात झाडांवर धुरळावी.

- तुडतुडे:

लक्षणे: हिरवट रंगाची किड असून पानातील रस शोषून घेते. त्यामुळे पाने आकसल्यासारखी दिसतात. तसेच या किडीमार्फत बोकड्या या विषाणू रोगाचा प्रसार होतो.



उपाय:

- रोपांच्या पुर्नलागवडीनंतर २ आठवड्यांनी २० मिली मेलॅथिऑन ५० टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

मावा:



लक्षणे: ही अतिशय लहान आकाराची किड पानांच्या पेशीमध्ये सोंड खुपसून पानातील रस शोषून घेते.

उपाय:

- २० मिली मेलॅथिऑन ५० टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

एकात्मिक किड व्यवस्थापन:

- लाल कोळी नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- लाल कोळी नियंत्रणासाठी इथोक्साझोल १० % एस.सी. १ ग्रॅम प्रती लिटर किंवा मॅलेथिऑन ५० टक्के प्रवाही २ – ३ मिली प्रती लिटर फवारावे.
- २० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी त्यामुळे किडींच्या अवस्था नष्ट होतात.
- पिकांची फेरपालट करावी.
- माती परीक्षणानुसार खते द्यावीत.
- ज्या जमिनीत टोमॅटो, मिरची, भेंडी किंवा वेलवर्गीय भाज्या घेतल्या असतील अशा जमिनीत वांग्याची लागवड करू नये.
- वांग्याचे उत्पादन जास्त मिळविण्यासाठी आणि फळगळ कमी करण्यासाठी कार्बेन्डॅझिम (०.१ टक्के) तीन फवारण्या फळ लागल्यापासून एक महिन्याच्या अंतराने कराव्यात.
- मावा, तुडतुडे किडी व रोग नियंत्रणासाठी रोगर १० मिली किंवा क्विनॉलफॉस २० मिली किंवा कार्बारील २० ग्रॅम यापैकी एक औषध बदलून १० लिटर पाण्यातून फवारावे. ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- सुक्ष्म अन्नद्रव्य २ लीटर प्रती ३०० लीटर पाणी याप्रमाणे २० दिवसाचे अंतराने फवारणी करावी. डी.ए.पी. ०.५ टक्के व १३:०:४५ हे ख़त ८ दिवसाचे अंतराने फवारण्या कराव्यात.
- जमिनीतून झिंक सल्फेट, फेरस सल्फेट, मॅग्निज सल्फेट १० किलो प्रत्येकी व बोरॅक्स २ किलो प्रती एकर प्रमाणे शेणखतासोबत द्यावे.
- जिवाणू खते अझाटोबॅक्टर २ किलो + पी.एस.बी. २ किलो + शेणखत मिसळून जमिनीतून द्यावे.
- लागवडीनंतर रोपावरील मावा, तुडतुडे, फूलकिडे या किडींच्या नियंत्रणासाठी बी पेरल्यानंतर दोन आठवड्यांनी १२ मिलीलिटर एन्डोसल्फॉन (३५ टक्के) किंवा २० मिलीलिटर मॅलेथिऑन (५० टक्के) किंवा २.५ मिलीलीटर फॉस्फॉमिडॉन (८५ टक्के) किंवा १० मिलीलिटर डायमेथोएट (३० टक्के) किंवा १० मिलीलीटर फार्मोथिऑन (२५ टक्के) १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

(संपर्क: +९१ ९१४६४१२२१०)

★ ★ ★